-: प्रेस नोट दिनांक- ३०/०३/२०२१ :-

**श्री संतोष सुभाष उपाध्ये, वय-३७, तलाठी, सजा इंगळी, वर्ग-३ रा.केडीसी बँक समोर कुरूंदवाड ता.शिरोळ जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत....**

---

यातील तक्रारदार श्री राजाराम वसंत कांबळे, रा. खेरीवडे,पो.धुंदवडे ता.गगनबावडा, जि. कोल्हापूर हे विटभट्टीसाठी लागणारी माती कॉन्ट्रक्टरचा व्यवसाय करतो. श्री.नामदेव कुबेर चव्हाण आणि श्रीमती सुशिला मल्लु सांगले रा.इंगळी,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर यांनी तक्रारदार यांना त्यांची इंगळी येथील शेती गट क्र. २९३ मधील १०० ब्रास माती वीट भट्टीसाठी उत्खनन करणेची परवानगी दिली आहे.

सदर जमीणीमधील माती उत्खनन करणेची परवानगी(रॉयल्टी) मिळणेकरीता तक्रारदार श्री कांबळे यांनी तलाठी श्री. उपाध्ये यांची भेट घेतली असता त्यावेळी त्यांनी शासकीय दंड, (रॉयल्टी) शासकीय फी, व त्याच्या व्यतिरीक्त ३०,०००/- रूपये द्यावे लागतील, पैसे दिले तरच मी त्या शेतजमिनीमधून माती उत्खनन करणेसाठी शासनाची परवानगी (रॉयल्टी)मिळणेबाबतचा प्रस्ताव कागदपत्रासह अपर तहसिलदार,इचलकरंजी यांना पाठविणार असे सांगितलेने, तक्रारदार यांनी इंगळी गावचे तलाठी श्री संतोष उपाध्ये यांचे लाचेच्या मागणीबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दि. २४/०३/२०२१ रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे इंगळी सजाचे तलाठी श्री संतोष उपाध्ये यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष केली असता, पडताळणीमध्ये तलाठी श्री संतोष उपाध्ये यांनी तक्रारदार यांचेबरोबर चर्चा करून शासकीय दंड, रॉयल्टी व त्याव्यतिरिक्त शेतजमिनीमधून माती उत्खनन करणेसाठी शासनाची परवानगी (रॉयल्टी)मिळणेबाबतचा प्रस्ताव कागदपत्रासह अपर तहसिलदार,इचलकरंजी यांना पाठविण्याकरीता ३०,०००/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती २५,०००/- रू. लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

यशस्वी पडताळणी कारवाईप्रमाणे आज दिनांक ३०/०३/२०२१ रोजी श्री संतोष उपाध्ये, तलाठी सजा इंगळी यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित केली असता, तलाठी श्री संतोष उपाध्ये यांनी तक्रारदार यांचेबरोबर चर्चा करून शासकीय दंड, रॉयल्टी व त्याव्यतिरिक्त त्या शेतजमिनीमधून माती उत्खनन करणेसाठी शासनाची परवानगी (रॉयल्टी)मिळणेबाबतचा प्रस्ताव कागदपत्रासह अपर तहसिलदार,इचलकरंजी यांना पाठविण्याकरीता मागणी केलेप्रमाणे २५,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरूध्द यशस्वी सापळा कारवाई करणेत आलेली आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी राजाराम वसंत कांबळे, रा. खेरीवडे,पो.धुंदवडे ता.गगनबावडा यांचे फिर्यादीवरून **संतोष सुभाष उपाध्ये, वय-३७, तलाठी सजा इंगळी वर्ग-३** यांचेविरूध्द इचलकरंजी पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री सुरज गुरव,अपर पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, यांचे मार्गदर्शनानुसार श्री. युवराज सरनोबत, पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. संजीव बंबरगेकर, पो.ना.सुनिल घोसाळकर, पोना कृष्णात पाटील, पोकॉ रुपेश माने ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**